# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी

प्रस्तावना :-

**विषय :- वॉर्ड क्रं. २१ कामतघर येथील जागनाथ महादेव मंदिर समोरील अष्टविनायक सोसायटी समोरील मुख्य रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या प्र.स.क्रं. ०३ अंतर्गत **वॉर्ड क्रं. २१ कामतघर येथील जागनाथ महादेव मंदिर समोरील अष्टविनायक सोसायटी समोरील मुख्य रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे.** (अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४२,८७,८९९/-) या कामाची बी-१ प्रकारची ई-निविदा मागविण्यात आली होती. सदर कामाची निविदा सुचना क्रं. १२७/२०२४-२५ (टेंडर क्र. ११२३०३०) वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन मागविणेत आली आहे. सदर कामासाठी एकुण दोन ई निविदा प्राप्त झालेल्या असुन, पात्र निविदाकार **मे. अचिंत्य कन्स्ट्रक्शन, पनवेल.** यांनी दिलेला देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा **०.००१%** टक्के कमी दराने असुन, कामाची रक्कम रु. **४२,८७,८५६/- (GST** सह) येत आहे.

**मे. अचिंत्य कन्स्ट्रक्शन, पनवेल.** यांची ई निविदा रक्कम **रु. ४२,८७,८५६/-** (अक्षरी रु. बेचाळीस लाख सत्याऐंशी हजार आठशे छप्पन्न रुपये मात्र) (**GST** सह) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामीच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखा व वित्त आधिकारी मुख्य लेखापरिक्षक तसेच अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारसीप्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक २२/०१/२०२५ रोजी पूर्व मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकीय ठराव मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं. :** 628 **दिनांक :-** 28/9 /२०२५

**वॉर्ड क्रं. २१ कामतघर येथील जागनाथ महादेव मंदिर समोरील अष्टविनायक सोसायटी समोरील मुख्य रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे.** (अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४२,८७,८९९/-) याकामी पात्र निविदाकार **मे. अचिंत्य कन्स्ट्रक्शन, पनवेल.** यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा **०.००१%** कमी दराने असुन, कामाची रक्कम रु. **४२,८७,८५६/-** (अक्षरी रु. बेचाळीस लाख सत्याऐंशी हजार आठशे छप्पन्न रुपये मात्र) (**GST** सह) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मुख्य लेखापरिक्षक व अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेष:त कलम ४५२ अ (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, वरिल नमुद कामाचे पात्र निविदाकार **मे. अचिंत्य कन्स्ट्रक्शन, पनवेल.** यांचे बरोबर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(क) नुसार संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका